खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजन

पुढारी

आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २२ रोजी

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने २२ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेव टाकळकर, मानद सचिव हरीभाऊ सांडभोर यांनी ही माहिती दिली.

महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणा दिन म्हणून साजरा होतो. त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेनिमित्ताने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना वक्तृत्व शैलीचा आविष्कार दाखवण्याची संधी मिळते. स्पर्धेचे हे ३५ वे वर्ष असून, वरिष्ठ व कनिष्ठ गटात स्वतंत्रपणे स्पर्धा होत आहे. वरिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय विचारसंस्कृतीसाठी वाचनसंस्कृती, A I : धोका की संधी,

हुतात्मा राजगुरू

दूरदर्शी नेतृत्व : अजितदादा पवार, पेपरफुटी आणि विद्यार्थी आंदोलने; तर कनिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय पर्यावरण संवर्धन : प्रत्येकाची जबाबदारी, युवकांचे आदर्श : स्वामी विवेकानंद, पेपरफुटी आणि विद्यार्थी आंदोलने, महिला अत्याचार : समाजासमोरील गंभीर आव्हान, हे आहेत. स्पर्धेसाठी दोन्ही गटांत वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक, अशी विविध बक्षिसे आहेत. त्यात रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. वरिष्ठ विभागात प्रथम क्रमांक ७५००, द्वितीय क्रमांक ५००० व तृतीय क्रमांक ३००० रुपये रोख बक्षीस देण्यात येणार आहे. तर, कनिष्ठ गटात प्रथम क्रमांक ५०००, द्वितीय क्रमांक ४००० व तृतीय क्रमांक ३००० रुपये देण्यात येणार आहेत. उत्तेजनार्थ सहा बक्षिसे प्रत्येकी २५०० रुपये देण्यात येणार आहेत. सांघिक बक्षीस म्हणून वरिष्ठ व कनिष्ठ गटात प्रत्येकी ५००० रुपये बक्षीस दिले जाणार आहे.

ही स्पर्धा राज्यस्तरीय असल्याने महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांनी आपला दोन्ही गटांसाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठविण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले आहे.

केअरटेकर
(जागा ४)
कोल्हापूर येथे घरकामासाठी मुलगा पाहिजे. दहावी पास, पदवीधरास प्राधान्य. प्रामाणिक, होतकरू व कष्टाळू. जेवण व राहणेची सोय. आकर्षक पगार दिला जाईल.
सविस्तर माहितीसह खालील

Pune Gramin Edition
Aug 19, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

लोकमत

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने दि. २२ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी दिली.

३४ वर्षांपासून दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणा दिन म्हणून साजरा होतो. त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. वरिष्ठ व कनिष्ठ गटात स्पर्धा होत आहेत. वरिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय विचार संस्कृतीसाठी वाचनसंस्कृती, एआय धोका की संधी, दूरदर्शी नेतृत्व अजितदादा पवार, पेपरफुटी आणि विद्यार्थी आंदोलने तर कनिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय पर्यावरण संवर्धन प्रत्येकाची जबाबदारी, युवकांचा आदर्श: स्वामी विवेकानंद, पेपरफुटी आणि विद्यार्थी आंदोलने, महिला अत्याचार : समाजासमोरील गंभीर आव्हान हे आहेत. स्पर्धेसाठी दोन्ही गटांत वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे आहेत. त्यात रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहेत.

> ३४ वर्षांपासून दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणा दिन म्हणून साजरा होतो.

वरिष्ठ विभागात प्रथम क्रमांक साडेसात हजार, द्वितीय क्रमांक पाच हजार व तृतीय क्रमांक तीन हजार रूपये रोख बक्षीस खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने देण्यात येणार आहे. कनिष्ठ गटात प्रथम क्रमांक पाच हजार, द्वितीय क्रमांक चार हजार व तृतीय क्रमांक तीन हजार रूपये रोख स्वरूपात खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या वतीने साहेबराव सातकर पाटील त्यांच्या स्मरणार्थ देण्यात येणार आहेत. उत्तेजनार्थ सहा बक्षिसे प्रत्येकी अडिच हजार रुपये रोख स्वरूपात वरिष्ठ व कनिष्ठ गटात अरिहंत ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने देण्यात येणार आहेत. सांघिक बक्षीस वरिष्ठ व कनिष्ठ गटात पाच हजार रुपये बक्षीस जीवन खराबी यांच्या वतीने देण्यात येणार आहे.

महाविद्यालयांनी दोन्ही गटांसाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, स्पर्धा प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले आहे.

Hello Pune Gramin
Page No. 8 Aug 19, 2026
Powered by: erelego.com

साप्ताहिक
हवेलीनामा
PRGI - MAHMAR/2021/89258
www.havelinama.in
मंगळवार,
दि. १८ ऑगस्ट, २०२६
संपादक
शरद पुजारी
(9423234740)

हुतात्मा राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

■ किरण खुडे

राजगुरूनगर : (हवेलीनामा प्रतिनिधी) : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने दि. २२ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे, आशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुटे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी दिली.

महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणा दिन म्हणून साजरा होतो. त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेच्या निमित्तांने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वक्तृत्व शैलीचा आविष्कार दाखवण्याची संधी मिळते.

स्पर्धेचे हे ३५ वे वर्ष असून, वरिष्ठ व कनिष्ठ गटात स्वतंत्रपणे स्पर्धा होत आहे.

वरिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय

- विचारसंस्कृतीसाठी वाचनसंस्कृती
- A I धोका की संधी
- दूरदर्शी नेतृत्व अजितदादा पवार
- पेपरफुटी आणि विद्यार्थी आंदोलने

कनिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय

- पर्यावरण संवर्धन प्रत्येकाची जबाबदारी
- युवकांचा आदर्श: स्वामी विवेकानंद
- पेपरफुटी आणि विद्यार्थी आंदोलने
- महिला अत्याचार : समाजासमोरील गंभीर आव्हान

स्पर्धेसाठी दोन्ही गटांत वैयत्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे आहेत. त्यात रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहेत.

वरिष्ठ विभाग (रोख बक्षीस)

- प्रथम क्रमांक ७५००/-
- द्वितीय क्रमांक ५०००/-
- तृतीय क्रमांक ३०००/-

रू. रोख बक्षीस खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने.

कनिष्ठ विभाग (रोख बक्षीस)

- प्रथम क्रमांक ५०००/-
- द्वितीय क्रमांक ४०००/-
- तृतीय क्रमांक ३०००/-

रोख स्वरूपात खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या वतीने साहेबराव सातकर पाटील यांच्या स्मरणार्थ.

उत्तेजनार्थ बक्षिसे (दोन्ही गट)

- ६ बक्षिसे प्रत्येकी २५००/-

रोख स्वरूपात अरिहंत ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने.

सांघिक बक्षिस (दोन्ही गट)

- प्रत्येकी ५०००/-

रोख बक्षीस जीवन खाबी यांच्या वतीने देण्यात येणार आहे.

ही स्पर्धा राज्यस्तरीय असल्याने महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांनी आपला दोन्ही गटांसाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवण्यांचे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले आहे.

दि. २२ ऑगस्ट, २०२६
स्थळ : हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर, जि. पुणे.

बातम्या व जाहिरात संपर्क - संपादक (९४२३२३४७४०) | हवेली तालुका प्रतिनिधी - अविनाश सोनवणे (९१२२२२०२६६)

राजगुरूनगरमध्ये उद्या वक्तृत्व स्पर्धा

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शनिवारी (ता. २२ ऑगस्ट) राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी ही माहिती दिली. हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या जयंतीनिमित्त (प्रेरणा दिन) आयोजित या स्पर्धेचे हे ३५ वे वर्ष आहे. वरिष्ठ गटासाठी विचारसंस्कृतीसाठी वाचनसंस्कृती, एआय : धोका की संधी, दूरदर्शी नेतृत्व : अजितदादा पवार आणि पेपरफुटी व विद्यार्थी आंदोलने हे विषय आहेत. तर, कनिष्ठ गटासाठी पर्यावरण संवर्धन प्रत्येकाची जबाबदारी, युवकांचा आदर्श : स्वामी विवेकानंद, पेपरफुटी व विद्यार्थी आंदोलने आणि महिला अत्याचार : समाजासमोरील गंभीर आव्हान हे विषय निश्चित केले आहेत. विजेत्यांना रोख रक्कम, प्रशस्तिपत्र, हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह अशी बक्षिसे दिली जाणार आहेत. महाराष्ट्रभरातील विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे व संयोजन समितीने केले आहे.

दै. सकाळ

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख